MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2019
Issue-30, Vol-03

Date of Publication
01 May 2019

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Assistant Professor
Shivaji College, Hingoli,
Tq.& Dist.Hingoli (MS.)

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta® Peer-Reviewed International Journal
April To June 2019
Issue-30, Vol-04


# Index

01) The impact of dimate change on Business Strategies
Nisha Agrawal, Bhopal MP ||10

02) Menstruation a Social and Traditional Taboo
Dr. Gagan Kumar , Smt. Priyanka Bharti, Sitapur ||12

03) RESERVATION FOR HIGHER CASTES COMMUNITIES IN INDIA .......
Jatavath Hanumu ,Hyderabad ||16

04) Flow of credit to agriculture in India
Prof. Dr. T. P. More,Buldana (MS) ||19

05) ENVIRONMENT AND HEALTH ISSUES OF MARBLE MINING .....
DR. Anju Ojha,DR. M. M.Sheikh, Churu ||23

06) The role of computers in mathematics learning
Anil Kumar Jain , Jaipur ||31

07) Sustainability of Economy and Money laundering
Prof. Dilpreet Kaur,LUDHIANA. ||36

08) Rosie-The Eternal Heroine in R.K. Narayans, The Guide
Asst. Prof.Shikha, Hariana ||43

09) A STATUS OF RURALWOMEN ENTREPRENEURSHIP IN INDIA ....
P. Thangaraj,Dr. P. Loganathan,Namkkaal (Dt) ||45

10) Economic Ideas of Mahadev Govind Ranade
Dr. Manjula Upadhyay, Lucknow ||49

11) An over View of Human Right in the Context of History
Vijay Shankar,Sri.Muktsar Sahib. ||55

12) Macrophytes Biodiversity of Sikam Reservoir from Rajura.....
S.A. Dhoble, Y.B. Gedam & M.B.Wadekar, Chandrapur ||58

13) Problems of Indian Agriculture Marketing
Prof. Dr. Sangram R. Raghuwanshi, Amravati ||61

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

SHIVAJI COLLEGE HINGOLI
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS)

SHIVAJI COLLEGE HINGOLI

14) ORIGIN OF THE POLICE ||64
Dr. G. Sanjeevayya, Andhra Pradesh

15) डोपिंग विरोधी चळवळ गतीमान करणे काळाची गरज ||68
डॉ.घायाळ बाबुराव लक्ष्मणराव,नांदेड

16) कविता गजाआडच्या : स्त्री जाणिवांचा अविष्कार ||70
प्रा.डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र गित्ते,बुलडाणा.

17) डोपिंगमुळे खेळाडूंवर होणारे परिणाम आणि उपाययोजना ||74
डॉ.जाधव धरमसिंग गेमसिंग,नांदेड

18) स्त्री दु:खाचा उत्कट उद्‌गार म्हणजे 'वेदन' ||76
प्रा. सौ. संगीता नारायणराव मुंढे, हिंगोली.

19) पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागातील आंतरविवाह ...... ||78
डॉ.संजय ज्ञानोबा सावंत,कोल्हापूर

20) एकोणिसावे शतक आणि महाराष्ट्रातील दलित चळवळ : एक आकलन ||81
डॉ.एस.डी. सावंत,लातूर

21) संत कवयित्रींच्या अभंगाची सामाजिक उपयुक्तता ||87
डॉ.प्रतिभा सुधीर पेंडके, कु.अर्चना शंकरराव कोहळे

22) भारतातील उच्च शिक्षण स्वरूप : विवेचन — एक अभ्यास ||90
प्रा.डॉ.उन्मेश शेकडे, लातूर

23) विद्यार्थी केंद्रीत महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ कायदा — २०१६ ||94
श्री.संतोष रंगराव शहापूरकर, कोल्हापूर

24) वडगाव लढाईतील भिवराव पानसे यांची कामगिरी (१७७९) ||97
प्रा.डॉ.भानुसे कारभारी लक्ष्मण,औरंगाबाद

25) अमर्त्य सेन यांचे अर्थिक विचार ||99
प्रा.डॉ.राजेंद्र निंबा बोरसे, लोणार

26) सोळाव्या लोकसभा निवडणूकीतील माध्यमांची सक्रियता व ... आणि ... ||101
गजानन सहादेव उपरीकर, नागपूर.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
April To June 2019
Issue-30, Vol-04


SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

18

# स्त्री दु:खाचा उत्कट उद्गार म्हणजे 'वेदन'

प्रा. सौ. संगीता नारायणराव मुंढे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

***********

आधुनिक मराठी साहित्यामध्ये जे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले त्यापैकी स्त्रीवादी साहित्याचा एक दमदार प्रवाह निर्माण झालेला पाहायला मिळतो. 'स्त्रीवाद' ही संकल्पनाच मुळात पाश्चात्य आहे. स्त्रीवादी चळवळीतून हा प्रवाह उदयास आला आहे. हाजारो वर्षापासून स्त्रीवर जो अन्याय अत्याचार होत होता, एक माणूस म्हणून स्त्रीला समानतेची वागणूक समाजात मिळत नव्हती, केवळ चूल आणि मुल येवढच तिचं कार्यक्षेत्र मर्यादित होतं यातून बाहेर पडण्यासाठी स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी जो लढा दिला त्यालाच स्त्रीवादी चळवळ असे म्हणता येईल. स्त्रियांची सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्तता करणे हे स्त्रीवादी चळवळीचे उद्दिष्ट आहे. स्त्रीवादी चळवळीला खाद्य पुरवण्याचं काम स्त्रीवादी साहित्य करते. मराठीमध्ये अनेक कवयित्रीने स्त्रीवादी दृष्टीने काव्यलेखन केले आहे त्यात सिसिलिया कार्व्हालो, नीरजा, अंजली कुलकर्णी, आसावरी काकडे, कविता महाजन, मीनाक्षी पाटील, मल्लिका अमरशेख, ज्योजी लांजेवार, अश्विनी धोंडगे, प्रज्ञा पवार, अंजली पेंडसे, रजनी परुळेकर अशा कितीतरी कवयित्रींनी स्त्रीवादी जाणिवेतून काव्यलेखन केले आहे. मराठवाडयातील स्त्रीवादी कवितेचा विचार केला तर स्त्रीवादी दृष्टिकोनातून कविता महाजन व वृषाली किन्हाळकर या दोघीनीच काव्यलेखन केलेले दिसते.

वैद्यकिय व्यवसाय करणाऱ्या डॉ. वृषाली किन्हाळकर यांनी दोनच काव्यसंग्रह लिहून स्वत:चा एक स्वतंत्र ठसा मराठी कवितेत निर्माण केला आहे. डॉ. वृषाली दत्तात्रय शास्त्री म्हणजेच मराठीतील नावाजलेल्या कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर. त्यांची आई सौ.ललिता शास्त्री यांनीच त्यांना अक्षरांचा लळा लावला. कवयित्री म्हणतात, आईला वाचनाची खूप आवड होती. तिनेच आम्हा बहिनिंना वाचनाची गोडी लावली. महाविद्यालयीन जीवनातच लेखिका कविता करायला लागतात.त्यांचा 'वेदन' हा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यानंतर त्यांचे 'तारी' हा कवितासंग्रह, 'सहजरंग' आणि 'संवेद्य' हे ललितलेखसंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांना त्यांच्या लेखनासाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत.किन्हाळकर या तरल मनाच्या कवयित्री आहेत. पेशाने डॉक्टर असूनही स्वत:चे वेगळे भावविश्व कवयित्रीने जोपासले आहे. आपला व्यवसाय करत असतानाच आलेल्या अनुभवांना शब्दबद्ध करण्याचे काम त्यांची कविता करते. सबंध स्त्री जीवनाचे चित्रण त्यांच्या कवितेतून येते. आपला हा कवितासंग्रह कवियित्रीने आपल्या तमाम पेशंटना अर्पण केला आहे. यात एकून त्र्यैसष्ट कविता आहेत. कवितेला शिर्षक नाहीत.पण प्रत्येक कविता म्हणजे स्त्री जीवनाचा एक स्वतंत्र अनुभव आहे. या कविता संग्रहाला 'कवी यशवंत पुरस्कार', म.सा.प. औरंगाबादचा ^कुसुमावली देशमुख उत्कृष्ट काव्य पुरस्कार, जालना येथील 'राय हरिश्चंद्र दुःखी पुरस्कार', 'सुभद्रा प्रतिष्ठान सेलू यांचा उत्कृष्ट काव्य पुरस्कार' इ. पुरस्कार मिळाले. या संग्रहाच्या चार आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. पृथ्वीराज तौर या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, "तरल अर्थवाही संवेदनेचं गाणं स्वत:च्या संपूर्ण अस्तित्वानिशी कसं व्यक्त होतं, याचं आदर्श उदाहरण म्हणून 'वेदन' चा उल्लेख करता येईल."१

वेदन या कवितासंग्रहातील कविता या स्त्रीचं दु:ख, वेदना, तिची भुमिका मांडणाऱ्या आहेत. आपलं सर्वस्व स्त्री आपल्या घरासाठी अर्पण करते. तिचं असं स्वता:चं स्वतंत्र आयुष्यच उरत नाही तिची ही भुमिका कवयित्री इथे संयत शब्दात मांडतात. 'स्त्रीवाद' म्हणजे स्त्री -पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना. ही त्यांची भावना आहे आणि त्यांच्या काव्यनिर्मितीच्या मुळाशीही ती दिसते. स्त्री जीवन म्हणजे अखंड दु:खाची यात्रा. स्त्री जन्माचं वर्णन नेमक्या शब्दात कवयित्री पुढीलप्रमाणे करते.

"आपल्या तमाम वेदना
पांढऱ्या एप्रनमागे बंद करून
'ती' येते
,पोटातल्या वेदनेतून
तिची मुक्तता करते
अन एक नवी वेदना जन्म घेते"२

जनूकाही वेदनेचा प्रवास म्हणजेच स्त्री जन्म होय. जनूकाही दु:ख भेगण्या साठीच स्त्रीचा जन्म झाला आहे की काय अशी परीस्थिती सभोवती पहायला मिळते.एका अल्लड अवखळ मुलीची स्त्री कधी होते हे कळत देखील नाही. जनरीतीप्रमाने संसार करणं हे तर तिचं भागधेय. लग्नाआधीचं आणि लग्नानंतरचं

Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Ta.& Dis

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

April To June 2019
Issue-30, Vol-04


स्त्रीचं आयुष्य यात खूप फरक असतो. भावी संसाराचे, भावी जोडीदाराविषयीचे जे स्वप्न तिने पाहिले होते ते कसे मृगजळ होते याची प्रचिती तिला लवकरच येते. प्रियकर जेंव्हा नवरा बनतो तेंव्हा त्याचे संपूर्ण वागणेच कसे बदलून जाते. याची खंत कवयित्रीने पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे.

"केशभरल्या आकाशातला उगवता सुर्य
अन मुक्त उधळणारी पाखरं
असं बरच काही पाहिलं होतं
आपल्या पहिल्या भेटीत
तिन्हीसांजा पिंजज्यातल्या राघूला लाल मिरची देताना
मला हे आठवतं कधी. . . . .कधी"[३]

चाकोरीबंद्ध आयुष्य जगतांना सगळया आशा, आकांक्षाचा बळी जातो. आपल्या साध्या इच्छा ती पूर्ण करु शकत नाही. स्त्री आपल्या प्रियकराशी त्याच्या घराशी पूर्णपणे एकरुप होते. त्याचं सुख दु:ख तेच तिचं बनतं. त्याच्याशिवाय तिचं असं स्वतंत्र अस्तित्वच नसतं. तो मात्र स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व अबाधित ठेऊन जगत असतो. तिच्या शिवाय त्यात्याकडे जगण्यासाठी बरच काही असतं. पण तिचं सर्वस्व तोच असतो. त्याच्यामध्ये ती आपलं स्वतंत्र अस्तित्वच विसरुन जाते.

"माझं भविष्य तू
माझं वर्तमान तू
मागे तू, पुढे तू
सारच तूझ्याभोवती गुरफटून
बिनचेहज्याची मी"[४]

स्त्रीसाठी तिचं घर आणि तिचा नवरा हेच सर्वस्व असते. आयुष्यभर ती त्यांच्यासाठीच जगते. स्वत:चे सर्वस्व देउनही तिच्या पदरी मात्र उपेक्षाच येते. तिच्या अस्तित्वाची दखलही कोणाला घ्याविशी वाटत नाही. तन मन धनाने ती ज्याची होते तो मात्र तिच्या त्यागाला तिचं कर्तव्य समजतो स्त्रीची ही व्यथा पुढीलप्रमाणे व्यक्त होते.

"पाण्यात मिसळावेत रंग
तशी तुझ्या अस्तित्वात मी विरघळत गेले
अदवैत म्हणजे काय
हे तूला समजावत असतानाच
कळलं की, हा माझा एकटीचाच प्रवास होता."[५]

आयुष्यात सर्वस्व देउनही स्त्री शेवटी एकटीच राहाते. कधीतरी तिला तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव होते तेंव्हा ही स्त्री म्हणते,

"तुमच्या तमाम इच्छांची ओझी वाहताना
मी विसरलेच होते
माझ्या पाठीला सुद्धा
ताठ होता येतं!"[६]

दुसज्यासाठी जगतांना कधीरती तिला स्वता: च्या ठीकाणी असलेल्या सुप्त अशा शक्तिची जाणीव होते. ही जाणीव म्हणजेच 'स्त्रीवाद' असे म्हणता येईल. ही स्त्री स्वत:च्या अस्तित्वाविषयी सजग होते. ती स्वत:च्या जगण्याचा विचार करायला लागते. तेंव्हा तिला जानवते आपले अर्थहीन जगणे. आपली होत असलेली फरफट. पुरुष तिच्या अस्तित्वाची दखल घेत नसेल तर ती स्वत्वाचा शोध घेते. कारण तुमचं अस्तित्वच कोणी मान्य करत नसेल तर ते तूमहाला स्वतालाच सिदध करुन दाखवावे लागते. त्याचप्रमाने स्त्रीला सुदधा स्वत:चे अस्तित्व स्वत: सिदध करावे लागेल. काळ बदलला तसा स्त्रीच्या जीवनातही बदल होतो आहे. स्त्री स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व शोधते आहे. तिच्या अंतरीक शक्तिचा शोध तिला लागतो आहे. मुक्तपणे श्वास ती घेते आहे, याचं वर्णन कवयित्री पुढीलप्रमाणे करतात,

"उंबरठयाबाहेरचं जग न पाहिलेली
तिची पावलं जेंव्हा व्यासपीठ चढतात शांतपणे
तेंव्हा
वर्षानुवर्ष दबलेल्या तिच्या ओठाच्या कोपज्यात
एक मोकळे स्मित जन्मते."[७]

हा अनुभव ती घेते तेंव्हा मुक्ततेचे स्मित, स्वातंत्र्याचा आनंद तिच्या चेहज्यावर पसरतो. एक आगळेच तेज तिच्या चेहज्याला प्राप्त होते. हा स्वातंत्र्याचा आनंद संबंध स्त्रियांना प्राप्त झाला पाहिजे तेंव्हा कुठे स्त्री मुक्त झाली असे म्हणता येइल. पृथ्वीराज तौर त्यांच्या कवितेबद्दल म्हणतात,"मराठी स्त्रीवादी कवितेला किन्हाळकरांची कविता पुढे नेते आणि नवे आयाम प्रदान करते. विचार आणि भावना यांचा असा समतोल मराठी कवितेत अभावानेच दिसतो."[८] अत्यंत संयत शब्दात नेमकेपणे कवयित्री आपला अनुभव व्यक्त करतात. कवयित्री वैद्यकीय क्षेत्रात काम करतात या क्षेत्रातिल प्रतिमांचा वापर त्यांनी आपल्या अनुभवाविष्कारासाठी केला आहे. मध्यमवर्गीय स्त्रीचं जगणं नेमक्या शब्दात ही कविता व्यक्त करते. हे व्यक्त होणं अगदी सहज आहे. त्यामुळे या सर्व कविता म्हणजे एका धाग्यात बांधलेल्या मण्याप्रमाणे आहेत आणि या मण्याना एकत्र बांधणारा हा धागा आहे स्त्री दु:खाचा.

संदर्भ

Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli

१) तौर पृथ्वीराज- वेदन, प्रस्तावना निर्मल प्रकाशन, नांदेड. चौथी आवृत्ती २०१६ पृ.०८
२) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ५७
३) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. १३
४) किन्हाळकर वृषाली - वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ५५
५) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. १८
६) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ३८
७) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ६०
८) तौर पृथ्वीराज, वेदन- प्रस्तावना निर्मल प्रकाशन, नांदेड. चौथी आवृत्ती २०१६ पृ.११

□□□

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

19

# पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागातील आंतरविवाह : एक समाजशास्त्रीय अध्ययन'

**डॉ.संजय ज्ञानोबा सावंत**
समाजशास्त्र विभाग,
शिवराज महाविद्यालय,गडहिंग्लज
जि.कोल्हापूर

************

**प्रस्तावना —**

प्रस्तुत अध्ययनात स्वामीरामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात पीएच.डी. प्राप्त प्रबंधाचा सारांश दिला आहे. हा प्रबंध विवाह, नातेदारी आणि कुटूंब या शाखेची संबंधीत आहे. संशोधनाचा उद्देश हा आंतरविवाहित व्यक्तींची विवाहपूर्व आणि विवाहानंतरची वैयक्तिक, वैवाहिक, कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक माहिती त्याच बरोबर आंतरविवाहानंतर त्यांना आलेले अनुभव आणि समस्या अभ्यासणे हा आहे.

**प्रकरण रचना**

प्रस्तुत प्रबंधाची सात प्रकरणांमध्ये विभागणी केलेली आहे.

प्रकरण : १ प्रस्तावना
प्रकरण : २ संशोधन पध्दती
प्रकरण : ३ आंतरविवाहितांची वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभुमी
प्रकरण : ४ आंतरविविहातांची आंतरविवाहानंतरची वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक स्थिती
प्रकरण : ५ आंतरविवाहानंतर आलेले अनुभव
प्रकरण : ६ आंतरविवाहानंतर निर्माण झालेल्या समस्या.
प्रकरण : ७ निष्कर्ष व शिफारशी

पुढील भागात संशोधन प्रबंधाचा प्रकरणानुक्रमे सारांश दिलेला आहे.